International Journal for Multidisciplinary Research
International Conference on Multidisciplinary Research & Studies 2023
E-ISSN: 2582-2160 ● Website: www.ijfmr.com ● Email: editor@ijfmr.com
ICMRS'23

# भारतीय साहित्यातील मराठी साहित्यीकांचे योगदान

सौ. अश्विनी श्रीकांत मानकर

मराठी अध्यापिका, स्कुल ऑफ स्कॉलर्स, यवतमाळ

सारांश :

भारतीय साहित्य हे ज्ञान विज्ञानाचे अथांग भांडार आहे. वेद, उपनिषद, दर्शनशास्त्र, योगशास्त्र, यांसारखे असंख्य मोती या महासागरात आहेत. “चिरपुरातन-नित्यनुतन” असे त्याचे वर्णन केले जाते. त्यामुळे प्राचीन भारतीय साहित्याचे नव्याने अध्ययन-संशोधन करून विज्ञानाच्या कसोटीवर खरे उतरले.

बिज शब्द : संस्कृती, संस्कार, आविष्कार, आत्मकथा, संप्रदाय, महानुभव, अष्टपैलु.

प्रस्तावना :

माणसाला निसर्गाकडून ज्या गोष्टी मिळतात, त्यावर माणूस आपल्या सृजनशीलतेच्या सहाय्याने प्रक्रिया, संस्कार करतो. या संस्कारांमधून निर्माण होणारे विचार, चालीरीती, पद्धती म्हणजेच माणसाची संस्कृती. प्रत्येक व्यक्तीची संस्कृती ही दुसऱ्या व्यक्तीच्या संस्कृतीकडून काही प्रमाणात का होईना वेगळी आणि स्वतंत्र असते. संस्कृती ही अनेक वर्षाच्या प्रक्रियेनंतर तयार होते. त्यामुळे समान भुभाग, निसर्ग असलेल्या व्यक्तींची संस्कृती सारखी असते. माणसाच्या भावविश्वाचा पाय असतो तो म्हणजे साहित्य आणि कला अविष्कार.

विषय प्रतिपादन :

समाजात असलेल्या कला, साहित्य, चित्रपट किंवा कोणतेही इतर कला प्रकार घ्या, ते माणसाच्या भावविश्वाचा आरसा असतात. हे कलाप्रकार समाजाचं मन तयार करतात, प्रेरणा जागृत ठेवतात, समाजाचे संस्कार आणि शहाणपण तपासत राहतात. आपला मराठी समाज जर सर्जनशील आणि विवेकी घडावा असं वाटत असेल तर विविध कला आणि साहित्य यांकडे विशेष लक्ष पुरविणे आपल्याला गरजेचे आहे.

भारतीय साहित्य विश्वामध्ये मराठी साहित्याचे एक वेगळे स्थान आहे. मराठी साहित्याला हे स्थान मिळवून देण्यासाठी अनेक मराठी साहित्यीकांनी आपले अमुल्य असे योगदान दिले आहे. त्यामध्ये प्रसिद्ध व अष्टपैलु अश्या अनेक मराठी साहित्यीकांचा समावेश आहे. जसे की आपल्या महाराष्ट्राचं लाडकं व्यक्तिमत्व पु. ल. देशपांडे म्हणजेच पुरूषोत्तम लक्ष्मण देशपांडे (जन्म-8 नोव्हेंबर 1919-मुंबई, मृत्यू- 12 जुन 2002-पुणे) मराठी साहित्यात विशेष असं नाव डोळ्यांसमोर येतं. आपल्या विनोदी शैलीतून फक्त लेखनच नाही तर अभिनेता, दिग्दर्शक, पटकथा लेखक व संगीतकार आणि नाटककार अशा अनेक रूपातून त्यांनी छाप पाडली. त्यांची प्रसिद्ध पुस्तके म्हणजे बटाट्याची चाळ, गोळाबेरीज, असा मी असामी, व्यक्ती

आणि वल्ली, तसेच अनेक पुरस्कार पुण्यभुषण, पद्मभुषण, पद्मश्री, साहित्य अकादमी पुरस्कार, संगीत नाटक अकादमी पुरस्कार, कालिदास सन्मान, इ. पुरस्कार त्यांच्या नांवावर आहेत.

त्याचप्रमाणे दुसरे व्यक्तिमत्व म्हणजे भालचंद्र नेमाडे (जन्म-27 मे 1938-सांगली (जळगाव)), मराठी साहित्यातील एक ज्येष्ठ कादंबरीकार, समीक्षक आणि कवी म्हणून यांना ओळखले जाते. त्यांनी वयाच्या 25 व्या वर्षी 'कोसला' या कादंबरीमधून खेड्यातुन पुण्यामध्ये येणाऱ्या तरूणाची आत्मकथा मांडली. ही कादंबरी प्रचंड लोकप्रिय झाली. नंतर त्या कादंबरीचे हिंदी, गुजराती तसेच अनेक भारतीय भाषांमध्ये अनुवाद झाले. नेमाडे यांना 2015 साली भारतीय साहित्यातील सर्वोच्च मानला जाणारा ज्ञानपीठ पुरसकार देऊन सन्मानित करण्यात आले.

विष्णु वामन शिरवाडकर (कुसुमाग्रज) (जन्म-27 फेब्रुवारी 1912-पुणे, मृत्यु-10 मार्च 1999-नाशिक). कुसुमाग्रज यांनी कवी, लेखक, नाटककार, कथाकार, कादंबरीकार व समीक्षक अशा अनेक रूपांत मराठी साहित्यामध्ये अमुल्य असे योगदान दिले आहे. त्यांनी कविता, नाटक, कादंबरी अश अनेक प्रकारच्या लिखाणातून मराठी भाषेला अमुल्य असा ठेवा दिला. मराठी साहित्यामधील त्यांच्या योगदानामुळे त्यांचा जन्मदिवस 27 फेब्रुवारी 'मराठी भाषा गौरव दिन' किंवा 'मराठी राजभाषा दिन' म्हणून साजरा केला जातो.

प्र. के. अत्रे म्हणजेच प्रल्हाद केशव अत्रे (जन्म-13 ऑगस्ट 1998-सासवड-पुणे, मृत्यु-13 जुन 1969- वरळी-मुंबई). प्रल्हाद केशव अत्रे म्हणजे महाराष्ट्रातील एक अष्टपैलू व्यक्तिमत्व. लेखक, कवी, नाटककार, शिक्षणतज्ञ, चित्रपट निर्माते, दिग्दर्शक, वृत्तपत्रकार, पटकथा लेखक, राजकीय नेते व उत्कृष्ट वक्ते, अशा विविध भूमिकांमधून त्यांनी मराठी साहित्य सृष्टीला आपले अमुल्य योगदान दिले आहे.

महाराष्ट्र साहित्य परिषदांसारख्या विविध साहित्यवर्धक वातावरण निर्माण करणाऱ्या संस्था, विशेषतः 'पंचधारा प्रतिष्ठान' इ. प्रकाशने संग्राह्य मध्ययुगीन काळातील (विशेषत:) संत प्रवृत्तीच्या साहित्य निर्मितीची प्रेरणास्थाने की ज्यात विशेषतः वारकरी, महानुभाव, नाथ, समर्थ, इ. वारकरी संप्रदायाच्या वारी करण्याच्या प्रथेमुळे संत साहित्याची निर्मिती व प्रचार होणे सुलभ झाले. देवतांच्या यात्रेपेक्षा वारीची प्रथा वेगळी व फक्त वारकरी संप्रदायाचा तो विशेष आहे. पंढरपूरच्या श्री विठ्ठलाच्या आषाढी-कार्तिकी वारीमुळे सांप्रदायिकांच्या नित्यनियमित भेटी होत असत. कीर्तन, भजन, प्रवचन, भारूडे, गवळणी यांच्या वारीमधील संपर्काने जनमाणसात सांस्कृतिक चलनवलन व तत्सदृष्य साहित्यनिर्मिती होत राहत असे.

दरवर्षी भरणारी अखिल भारतीय वा जागतिक पातळीवरची साहित्य संमेलने, त्याचप्रमाणे त्याच्याच पावलावर पाऊल टाकून होणारी प्रांतिक, ग्रामीण, दलित, संत, महिला, इ. संमेलने, अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलने, अखिल भारतीय पातळीवरील 1878 पासूनच्या साहित्य संमेलनांपैकी काही संमेलनांचे अध्यक्षपद ज्यांनी भूषविले त्या मान्यवरांची यादी पुढील प्रमाणे देण्यात आली आहेत.

| सन | अध्यक्ष | स्थळ |
|---|---|---|
| 1947 | न. र. फाटक | हैदराबाद |
| 1951 | . का. प्रियोळकर | कारवार |
| 1953 | वि. द. घाटे | अहमदाबाद |
| 1954 | लक्ष्मणशास्त्री जोशी | दिल्ली |

| | | |
|---|---|---|
| 1957 | अनंत काणेकर | औरंगाबाद |
| 1961 | कुसुमावती देशपांडे | ग्वाल्हेर |
| 1964 | वि. वा. शिरवाडकर | मडगाव |
| 1965 | बा. ल. कुलकर्णी | हैदराबाद |
| 1973 | ग. दि. माडगूळकर | यवतमाळ |
| 1974 | पु. ल. देशपांडे | इचलकरंजी |
| 1975 | दुर्गा भागवत | कऱ्हाड |
| 1981 | गो. नी. दांडेकर | अकोला |
| 1983 | व्यंकटेश माडगूळकर | अंबाजोगाई |
| 1988 | वसंत कानेटकर | ठाणे |
| 1990 | मधु मंगेश कर्णिक | रत्नागिरी |
| 1992 | रमेश मंत्री | कोल्हापूर |
| 1993 | विद्याधर गोखले | सातारा |
| 1995 | नारायण सुर्वे | परभणी |
| 1996 | शांता शेळके | आळंदी |
| 1998 | द. मा. मिरासदार | परळी वैजनाथ |

अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन

| संमेलन क्र. | वर्ष | ठिकाण | अध्यक्ष |
|---|---|---|---|
| 83 वे | 2010 | पुणे | दत्तात्रय भिकाजी कुळकर्णी |
| 84 वे | 2011 | ठाणे | उत्तम कांबळे |
| 85 वे | 2012 | चंद्रपुर | वसंत आबाजी डहाके |
| 86 वे | 2013 | चिपळूण | नागनाथ कोतापल्ले |
| 87 वे | 2014 | सासवड (पुणे) | फकीरराव मुंजाजी (फ. मुं.) शिंदे |
| 88 वे | 2015 | घुमान (पंजाब) | सदानंद मोरे |
| 89 वे | 2016 | पिंपरी (पुणे) | श्रीपाल सबनीस |
| 90 वे | 2017 | डोंबिवली | अक्षयकुमार काळे |

मध्ययुगीन काळात आधुनिक काळाप्रमाणे आडनावे सांगण्याची पद्धत नव्हती. त्यामुळे हे साहित्यिक त्यांच्या नावानीच परिचित आहेत. ती त्यांची टोपणनावे आहेत.

मध्ययुगीन काळातील मराठी संत कवयित्री :

| | | |
|---|---|---|
| 1 | महदंबा (आद्य मराठी कवयित्री) | महानुभाव संप्रदाय – विवाहसमारंभात म्हटल्या जाणाऱ्या 'धवळे' या नव्या वाड्.मयप्रकाराची रचना (मराठीतील पहिले कथाशास्त्र) |
| 2 | मुक्ताबाई | नाथ संप्रदाय – ज्ञानेश्वरांची धाकटी बहीण 'ताटी उघडा ज्ञानेश्वरा' हे लेखन प्रसिद्ध. |

| | | |
|---|---|---|
| 3 | जनाबाई | वारकरी संप्रदाय – नामयाची दासी व ज्ञानेश्वरांची शिष्या. |
| 4 | सोयराबाई | चोखामेळ्याची पत्नी – 'चोख्याची महारी' हे टोपण नाव. |
| 5 | कान्होपात्रा | वारांगनेची कन्या – 'नको देवराया अंत आता पाहू' हा गाजलेला अभंग. |
| 6 | बहिणाबाई | तुकारामांची शिष्या – आपल्या तेरा पूर्वजन्मांचा परिचय लिहून ठेवला आहे. 'संतकृपा झाली \| इमारत फळा आली'\| हा गाजलेला अभंग लिहिणारी. |
| 7 | वेणाबाई | समर्थ रामदासांची शिष्या. |

मध्ययुगीन काळातील महत्वाचे संप्रदाय – नाथ, महानुभाव, वारकरी, दत्त, समर्थ, जैन, आनंद, नागेश, इत्यादी. या संप्रदायातील प्रमुखांनी व उपासकांनी मराठीत वाङ्.यनिर्मिती केली व विविध प्रसारमाध्यमे योजून ती जतन केली.

मध्ययुगीन कालखंडातील महत्वाचे संत व त्यांचे महत्वाचे ग्रंथ :

| | | |
|---|---|---|
| 1 | मराठीचा आद्य कवी मुकुंदराय | विवेकसिंधु ज्ञानेश्वरपूर्व एक शतक |
| 2 | माहिमभट्ट | लीळाचरित्र (महानुभाव संप्रदायाचे संस्थापक श्रीचक्रधरस्वामींचे चरित्र) |
| 3 | नामदेव | अभंगगाथा, संतांची चरित्रे, ज्ञानेश्वरांचे (1) आदी, (2) तीर्थावळी व (3) समाधी या तीन भागात चरित्र, शिखांचा धर्मग्रंथ गुरू ग्रंथसाहिब यामध्ये नामदेवांचे अभंग समाविष्ट आहेत. |
| 4 | ज्ञानेश्वर | ज्ञानेश्वरी (भावार्थदीपिका हे मूळ ग्रंथनाम – गीतेचा अनुवाद) अमृतानुभव, चांगदेवपासष्टी. |
| 5 | नृसिंह सरस्वती, सरस्वती गंगाधर | गुरूचरित्र |
| 6 | एकनाथ | भावार्थ रामायण (रामायणाचा अनुवाद), रूक्मिणीस्वयंवर, एकनाथी भागवत, भारूडे व गौळणी. |
| 7 | तुकाराम | गाथा (गाथेमध्ये तुकारामांचे 4092 अभंग समाविष्ट आहेत.) |
| 8 | रामदास | दासबोध, मनाचे श्लोक, करूणाष्टके, धन्यते, गायनी कळा. |

मराठीतील पंडित व त्यांचे प्रमुख ग्रंथ :

| | | |
|---|---|---|
| 1 | दासोपंत | गीतार्णव, पदार्णव, पासोडी |
| 2 | मुक्तेश्वर | (कलाकवी) मुक्तेश्वरी महाभारत, शतमुखरावणवधाख्यान |
| 3 | सामराज | रूक्मिणीस्वयंवर |
| 4 | रघुनाथपंडित | नलदमयंतीस्वयंवराख्यान |
| 5 | वामनपंडित | यथार्थदीपिका, समश्लोक गीता, गीतसुधा, वेणुसुधा |
| 6 | निरंजनमाधव | सुभद्राचंपू |
| 7 | श्रीधर | श्रीरामविजय, पांडवपताप, शिवलीलामृत |
| 8 | मोरोपंत | (महाभारताचा अनुवाद) आर्याभारत, केकावली, स्त्रीगीते, संशयरत्नमाला |

International Journal for Multidisciplinary Research
International Conference on Multidisciplinary Research & Studies 2023
E-ISSN: 2582-2160 ● Website: www.ijfmr.com ● Email: editor@ijfmr.com

मराठीतील प्रमुख शाहीर :

| | | |
|---|---|---|
| 1 | राम जोशी | सुंदरा मनामधी भरली. |
| 2 | प्रभाकर कवी | प्रभाकराची जडण घडण, खणखणीत म्हणायला. |
| 3 | अनंतफंदी | बिकट वाट वहिवाट नसावी, धोपट मार्ग सोडू नको. |
| 4 | होनाजी | घन:श्याम सुंदरा, श्रीधरा – भूपाळी. |
| 5 | सगनभाऊ | राजा कुणीकडे, प्रजा कुणीकडे \| काय अशी आग पाखडली. |
| 6 | परशराम | जुने कायदे अगदी मोडले \| जधीपुन झाली अंगेजी. |

महानुभावीयांचे साती ग्रंथ :

| | | | |
|---|---|---|---|
| 1 | शिशुपाल वध | 1308 | भास्करभट्ट बोरीकर |
| 2 | एकादशस्कंध | 1309 | भास्करभट्ट बोरीकर |
| 3 | वच्छाहरण | 1278 | दामोदर पंडित |
| 4 | रूक्मिणीस्वयंवर | 1292 | नरेंद्र पंडित |
| 5 | ज्ञानप्रबोध | 1331 | विश्वनाथ बाळापूरकर |
| 6 | सह्याद्रीवर्णन | 1322 | खळो व्यास |
| 7 | ऋद्धिपूरवर्णन | 1363 | नारो बाहळिये |

वारकरी संप्रदायांची प्रस्थानत्रयी :

| अ.क्र. | ग्रंथ | संत |
|---|---|---|
| 1 | ज्ञानेश्वरी | ज्ञानेश्वर |
| 2 | एकनाथी भागवत | एकनाथ |
| 3 | तुकारामांची गाथा | तुकाराम |

संतांचे मार्गदर्शन :

| | | संत |
|---|---|---|
| 1 | नाचू कीर्तनाचे रंगी<br>ज्ञानदीप लावू जगी | नामदेव |
| 2 | माझा मऱ्हाटीचि बोलू कातुके<br>परि अमृतातेही पैजा जिंके | ज्ञानेश्वर |
| 3 | संस्कृतवाणी देवे केली<br>प्राकृत (मराठी) काय चोरापासून झाली ? | एकनाथ |
| 4 | आम्हां घरी धन, शब्दांचीच रत्ने<br>शब्दांचीच शस्त्रे, यत्ने करू | तुकाराम |
| 5 | येत्र तो देव जाणावा<br>आधी संसार करावा नेटका \|<br>मग लागावे परमार्थ विवेका \| | रामदास |

संतांचे आंतरभारती कार्य :

| | | |
|---|---|---|
| 1 | नामदेव | शिखांचा धर्मग्रंथ गुरू ग्रंथसाहिब यामध्ये नामदेवांचे अभंग समाविष्ट आहेत. पंजाबच्या 'घुमान' गावी 20 वर्षे संतसाहित्याचा प्रसार. |
| 2 | ज्ञानेश्वर | वारकरी संप्रदायातील प्रस्थानत्रयीतील पहिला ग्रंथ – ज्ञानेश्वरी. |
| 3 | एकनाथ | काशीक्षेत्री त्यांच्या 'चतु:श्लोकी भागवत' या मराठी ग्रंथाची हत्तीवरून मिरवणूक. वारकरी संप्रदायातील प्रस्थानत्रयीतील दुसरा ग्रंथ – एकनाथी भागवत. |
| 4 | तुकाराम | वारकरी संप्रदायातील प्रस्थानत्रयीतील तिसरा ग्रंथ – तुकारामांची अभंगगाथा. |
| 5 | रामदास | भारतामध्ये अनेक ठिकाणी मठ स्थापना. |

आधुनिक काळातील मराठीबद्दलचे गौरवोद्गार :

| | | |
|---|---|---|
| 1 | माधव ज्यूलियन | मराठी असे आमुची मायबोली । तिला बैसवू वैभवाचे शिरी. |
| 2 | सुरेश भट | साय मी खातो मराठीच्या दुधाची ।<br>मी कुणाचा ठंबरा झिजवू कशाला । |
| 3 | डॉ. अशोक केळकर | मराठी भाषेला सलाईनवर ठेवण्याची वेळ आलेली नाही, पण टॉनिक द्यायची वेळ नक्कीच आलेली आहे. |

मराठीतील विविध क्षेत्रातील नियतकालिकांद्वारे साहित्याला प्रेरणा व वाड्.मयाला वळण देण्याचे कार्य होत होते. अशा नियतकालिकांपैकी काही उल्लेखनीय नियतकालिके पुढीलप्रमाणे –

| नियतकालिकाचे नांव | संपादक |
|---|---|
| विविध ज्ञान विस्तार | रा. भि. गुंजीकर |
| निबंधमाला | विष्णुशास्त्री चिपळूणकर |
| करमणूक | ह. ना. आपटे |
| अभिरूची | चित्रे-पतीपत्नी |
| सत्यकथा | श्री. पु. भागवत |
| महाराष्ट्र साहित्य परिषद | महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे |
| प्रतिष्ठान | मराठवाडा साहित्य परिषद |
| युगवाणी | विदर्भ साहित्य परिषद |
| पंचधारा | हैदराबाद साहित्य परिषद |
| आलोचना | प्रा. वसंत दावतर |
| ललित | केशवराव कोठावळे |

निष्कर्ष :

साहित्यातून वास्तवाचे दर्शन घडत असते हे सिद्ध होते. अशा प्रकारच्या वास्तव जीवनाचे प्रतिबिंब उमटणाऱ्या साहित्याला एक स्थान प्राप्त होते. जीवन व्यवहाराचे भावनिक, आध्यात्मिक, बौद्धिक अशा विविध अंगांनी घडविलेले सर्जनशील, वैचारिक, कल्पनात्मक, वास्तव अशा भिन्न स्तरावरचे सर्वांगिण, सम्यक दर्शन साहित्यातून आपल्याला प्रतित होते.

आपल्या भारतीय संस्कृतीत अनेक हिरे होवून गेले, ज्यांचे भारतीय मराठी साहित्य संस्कृतीमध्ये खरंच खुप मोलाचे असे योगदान असल्याचे या संशोधनातून दिसून आले. त्याचप्रमाणे, साहित्यीक, सामाजिक, राजकीय, मध्यमवर्गीय, विविध क्षेत्रातील महिला वर्ग, गृहिणी, नाटककार, इत्यादी विविध क्षेत्रातील व्यक्तींनी आपला अमौलीक असा ठसा साहित्यात उमटविला आहे. व त्यामुळेच आज मराठी साहित्य जागतिक पातळीवर पोहचले आहे.

संदर्भ सूची :

1. भारतीय साहित्यशास्त्र - गणेश त्र्यंबक देशपांडे
2. मराठीचा शब्दसंग्रह - डॉ. लीला गोविलकर
3. www.marathiworld.com